# ती आली

पुनवेचे चांदणे होते, अन दुधाची बरसात
जेवण आटोपून लवंडलो, होतो मी नुकताच

दिवसभरच्या श्रमांनी, काळवंडली होती मुद्रा
दबकत्या पावलांनी, धावत आली निद्रा

अचानक खोलीमधे प्रकाश, पडला निळा शार
अन काय चमत्कार, आपोआप उघडले दार

तत्काळ मी उठलो, काळीज धडधडू लागले
अन तिला पाहताच, माझे देहभान हरपले

तनात आनंद मनात आनंद, जग आनंदमय झाले
जागोजाग आनंदाचे, कारंजे नाचू लागले

अवतरली ती सुंदरी, वेषात आगळ्या
स्मित करणारे ओठ, जणू जाईजुईच्या कळ्या

जवळ आली आणि, माझ्या निकट बसली
हाती हात घेऊन, प्रेमाने कुरवाळू लागली

हर्षोत्फुल्ल वारा, झुळझुळू लागला मंद
विश्वी पसरला तिच्या, स्नेहाचा मंद सुगंध

हृदयांच्या संभाषणात, जाणीव सारी हरपली
जाग आली जेव्हा पूर्वेच्या, गाली उतरली लाली

जाण्यापूर्वी दिले तिने, मला शेवटचे आलिंगन
उजव्या गालावर ठसविले, तिने शेवटचेच चुंबन

आली तशीच गेली ती, पुन्हा येणार नाही आता
सौख्याची देवताच जणू, ती होती माझी माता

By Abhay B. Joshi (1976)